**विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११**

**(निशाणी ११७ खाली आदेश)**

**१.** प्रस्तुत प्रकरणी वादींतर्फे अर्ज सादर करण्यात आलेला आहे की, मुळ वादी कमलाकर एकनाथ साळुंखे यांचे दिनांक २५/०८/२०१६ रोजी निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात श्रीमती रत्नप्रभा साळुंखे या पत्नी व उदयसिंह, प्रतापसिंह व विजयसिंह ही मुले आणि सौ. राधीका गोविंद चव्हाण ही मुलगी हेच कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त वारस अभिलेखावर मुदतीमध्ये घेणे आवश्यक होते. मात्र घरातील मुख्य व्यक्तीच्या निधानामुळे इतर वारस सावरलेले नव्हते आणि त्यांना प्रस्तुत प्रकरणातील माहिती देखील नव्हती. त्यामुळेच वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणामध्ये उपरोक्त नमुद वारसांचे मौलीक अधिकार आहेत. त्यामुळे या वारसांची मयत वादीचे वारस म्हणून प्रस्तुत प्रकरणी नोंद होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळेच वारस अभिलेखावर झालेला विलंब माफ करुन abatement set aside करण्यात यावे यासाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज सादर केला.

**२.** प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे म्हणणे सादर करण्यात आले की, अर्जदाराने abatement set aside करण्यासाठी व वारस अभिलेखावर घेण्यासाठी दोन स्वतंत्र अर्ज देणे गरजेचे होते. मात्र तसे न करता अर्जदाराने केवळ एकच अर्ज सादर केला आहे. त्यामुळेच अर्ज बेकायदेशीर असून तो नामंजुर करण्यात यावा. तसेच अर्ज मंजुर करण्यात आल्यास अर्जदाराकडुन प्रस्तुत प्रतिवादींना दंड म्हणून २,०००/– रुपये देण्यात यावेत.

**३.** प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. त्यामुळे प्रकरणाची वस्तुस्थिती व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद पाहता, खालील मुद्दे निश्चित करण्यात आले व त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणांद्वारे नोंदवत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार सिध्द करतात का की, अर्ज निशाणी ११७ | **''होकारार्थी''** |

| | | |
|---|---|---|
| | मंजुर करुन त्यात नमुद केल्याप्रमाणे वारस अभिलेखावर घेण्यात ते पात्र आहेत ? | |
| २ | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र णें मि मां सा</u>

**४.** अर्जदारातर्फे विद्वान वकील श्री. डी.जे. भोसले व प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विद्वान वकील श्री. एन.डी. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता मुळ वादी कमलाकर एकनाथ सांळुखे यांचे दिनांक २५/८/२०१६ रोजी निधन झालेले असून अर्जात नमुद केलेल्या व्यक्ती त्यांच्या कायदेशीर वारस आहेत या बाबत दोन्ही पक्षामध्ये कसलाही वाद नाही. वारस अभिलेखावर घेण्यासाठी विहित मुदतीपेक्षा १४ दिवसाचा विलंब झालेला आहे. अर्जदाराने abatement set aside करण्यासाठी व वारस अभिलेखावर घेण्यासाठी दोन स्वतंत्र अर्ज देणे गरजेचे होते.मात्र अर्जदारातर्फे एकच अर्ज करणेत आलेला आहे. मात्र प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता व प्रस्तुत प्रकरणात वारसांच्या मौलीक अधिकाराबाबत चौकशी होणार असल्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारसांची नोंद अभिलेखावर घेणे न्यायसंगत राहील. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर ''होकारार्थी'' देतो.

**<u>मुद्दा क्र.२ साठीः</u>**

**६.** मुद्दा क्र. १ चे होकारार्थी निष्कर्ष पाहता अर्ज मंजुर करणे न्यायसंगत राहील. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर खालील प्रमाणे देत आहे.

## <u>आ दे श</u>

१ अर्ज निशाणी ११७ मंजुर करण्यात आला.

२ मयत कमलाकर एकनाथ सांळुखे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच याबाबतची abatement set

aside करण्यात येते.

३ अर्जदारांनी निशाणी ११७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कायदेशीर वारसांची नोंद अभिलेखावर घ्यावी व दुरुस्त वादपत्र दिनांक १४/०२/२०१७ रोजी किंवा त्यापुर्वी सादर करण्यात यावी.

दिनांकः २५.०१.२०१७

(हे. भा. सिरसाळकर )

**दिवाणी न्यायाधीश व स्तर, पंढरपूर**

## Certificate

I affirm that, the contents of this PDF file – Order is same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| a) Name of the Jr. Clerk | : | Shri. A. K. B. Shaikh |
| b) Court | : | C.J.S.D. Court, Pandharpur |
| c) Judgment / Order signed by P. O. on | : | 25/01/2017 |
| d) Judgment / Order uploaded on | : | 31/01/2017 |